शैक्षणिक संदर्भ अंक १२१ डिसेंबर २०१९ – जानेवारी २०२०

## वाचन विकसन - भाग २

# वाचनाचा एक प्रयोग

लेखक : कृतिका बुरघाटे

## वाचन विकसन - भाग २

# वाचनाचा एक प्रयोग

### लेखक : कृतिका बुरघाटे

*शैक्षणिक संदर्भ अंक १२० (ऑक्टो-नोव्हें २०१९) मध्ये 'वाचन विकसन' या लेखाच्या पहिल्या भागात मुले आकलनपूर्वक वाचन का करू शकत नाहीत, या प्रश्नाचा धांडोळा घेतलेला होता. कृतिका बुरघाटे यांनी स्वतःच्या निरीक्षणांवरून काही निष्कर्ष काढले होते, ते आपण मागील लेखात पाहिले. मग त्यांआधारे मुलांमध्ये समजपूर्वक वाचनाचे कौशल्य विकसित करण्यासाठी त्यांनी एक प्रयोग केला, त्याबद्दल वाचूया, ह्या लेखात.*

मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून मी वाचनालयाचा उपक्रम माझ्या वर्गापुरता सुरु केला. मग मुलांची वाचनातली समज किती आहे हे पडताळून पाहण्याची खूप इच्छा झाली, म्हणून एक साधा प्रयोग केला. त्या प्रयोगातून जे काही समोर आले ते मजेदार होते.

सर्वात प्रथम जो मुद्दा समोर आला तो म्हणजे 'वाचन म्हणजे काय' हेच मुळी मुलांना समजलेले नाही.

दुसरे म्हणजे मुलांना **समजपूर्वक** कसे वाचावे हेदेखील कळलेले नाही किंवा असेही म्हणता येईल की **समजपूर्वक वाचन** म्हणजे काय हेच कळलेले नाही.

मुले उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे देतात. पण ती उत्तरे समजपूर्वक देतात काय हा प्रश्नच आहे. बहुतेक वेळा शब्दाला शब्द जोडून आला की त्या ओळीत उत्तर आहे हा मुलांचा समज असतो.

उदाहरणार्थ, '....गणू शेवटच्या बाकावर बसणारा मुलगा होता. तो खूप खोडकर होता. त्याला वाचता-लिहिता येत नव्हते. तो वर्गात खूप गोंधळ घालायचा...' या उताऱ्यावर जर असा प्रश्न केला की, 'कुणाला वाचता-लिहिता येत नव्हते?' तर बहुतेक मुले याचे उत्तर लिहिताना, 'त्याला वाचता-लिहिता येत नव्हते.' असे लिहितात.

याचा अर्थ त्यांना वाक्यांचा अर्थ लावता आला नाही. दोन वाक्यांचा संदर्भ जर मुलांना जोडता येत नसेल तर संपूर्ण उताऱ्याचा अर्थ ते कसा लावू शकतील?

"आपण काय वाचले ते सांगता येणे म्हणजे समजपूर्वक वाचन," असे तूर्तास मी त्यांना सांगितले.

मुलांना १२ पानी कथा वाचायला दिली. मुलांनी ती वाचली. तीन-चार वेळा तीच कथा वाचायला सांगितले.



"आता या कथेत काय वाचले कुणी सांगेल का मला?" असा प्रश्न केला.

पण "आम्हाला नाही सांगता येत ही कथा. आम्हाला नाही काही समजले." असे उत्तर आले.

"असे कसे नाही सांगता येत? तुम्ही वाचले ना? काहीतर नक्कीच माहिती असेल? कथेचे नाव? कथेतील नायक? कथेत काय प्रसंग होता? काय घडले? काय झाले? कोण काय म्हणाले?" असे खूप प्रश्न मी त्यांच्यासमोर मांडले.

एका तरी प्रश्नाचे उत्तर नक्कीच येईल असे वाटले होते.

कथेचे नाव मुलांनी सांगितले. कथेचा नायकही सांगितला. पण कथेत काय वाचले ते मात्र सांगता आले नाही.

मग मी एका विद्यार्थिनीला कथा वाचायला सांगितली. सगळ्यांनी ती ऐकली. मग तेच प्रश्न मी पुन्हा विचारले.

आता मात्र मुले पटापट उत्तरे देत होती. कथेतील प्रसंगही त्यांना सांगता आला.

मला हे जाणवले की, मुलांना वाटते कथेत काय घडले ते सांगा म्हणजे पूर्ण कथा जशीच्या तशी सांगणे.

मी म्हटले, "कथेत मुख्य काय आहे ते सांगणे म्हणजे आपल्याला काय समजले ते सांगणे." मी त्यांना नेहमीचा सिनेमाचा दाखला दिला. "तीन तासाच्या सिनेमाची गोष्ट नाही का आपण दोन-चार मिनिटात सांगतो तस्सं!!"

"आम्हाला नाही तशी वाचलेली कथा सांगता येत," असे पुन्हा मुले म्हणाली. "आम्हाला समजतच नाही," हे त्यांचे विधान ठरलेले होते.

मी त्यांना एक लांबलचक कथा सांगितली, अगदी रंगवून. कथा जुनीच, श्रावण बाळाची. पण ती सांगताना निसर्ग वर्णन आणि श्रावण बाळाच्या प्रवासाचे काही टप्पे अतिरंजितपणे सांगितले. मुले ऐकतच होती. शेवटी कथा संपली ती श्रावण बाळाच्या आई-वडिलांच्या मृत्यूने.


आता मुलांना मी पुन्हा तेच प्रश्न विचारले. मुलांनी धडाधड उत्तरे दिली. आणि मुख्य म्हणजे कथेत नेमके काय होते - श्रावण बाळाची भक्ती, त्याचा करुण मृत्यू आणि राजा दशरथाला मिळालेला शाप - हे मुलांनी अगदी अचूक सांगितले. थोडक्यात कथा सांगण्याचाही चार-पाच मुलांनी प्रयास केला.

मी रोज त्यांना एक कथा सांगू लागले आणि त्याचा सारांश त्यांना विचारू लागले. मुले आता त्यात तरबेज झाली. पण हे सारे ऐकीव कथेबाबत होत होते.

आता त्यांना मी कथा वाचून दाखवू लागले. मुले त्याचे सारांश रूपाने कथन करू लागली.

पण स्वतः वाचून कथा सांगणे काही मुलांना जमेना.

खूप लहान-लहान, पहिली-दुसरीच्या मुलांच्या वयाच्या कथेचे पुस्तक मी त्यांना दिले. उदाहरणार्थ -"एक होतं झाड".



मुले ते वाचून सारांश सांगू लागली. मुलांना कथेचा सारांश सांगणे म्हणजे कथा जशीच्या तशी सांगणे अशी जी भावना होती ती आता बदलू लागली. पण हे फार लहान कथांपुरते मर्यादित होते.

आता मी मुलांना, “तुम्हीच वाचा आपसात आणि सांगा एकमेकांना” असं म्हणून तीन-तीन मुलांचे गट करून पुस्तके दिली, मुलं मिळून कथा वाचायची आणि ऐकलेले, वाचलेले समजून सांगायची.

तीनवरून दोनवर आणि दोनवरून एकवर आणत मी मुलांचे समजपूर्वक वाचनाचे कौशल्य विकसित करण्याचा प्रयास करीत होते.

८०% मुलांना एक महिन्याच्या आत वाचलेली कथा सारांश रूपात सांगता येऊ लागली आहे. बाकीच्या मुलांवर काम सुरू आहे. ती अजून गटा-गटात वाचन करत आहेत.

§§§

---

लेखक : **कृतिका बुरघाटे,** भाषा शिक्षिका, जि.प.उच्च प्राथमिक शाळा, मसाळा (तुकुम), केंद्र- दुर्गापूर, प.स. चंद्रपूर येथे सध्या कार्यरत, विषय सहायक: इंग्रजी, DIECPD, चंद्रपूर.
इमेल : Krutikaburghate@gmail.com

---

***शिक्षकांना आवाहन***

*मुलांच्या वाचन कौशल्याबद्दल तुमची काय निरीक्षणे आहेत? तुम्ही मुलांचे वाचन कौशल्य वाढवण्यासाठी काही वेगळे प्रयोग केले आहेत का? आम्हाला जरूर कळवा.*

*-शैक्षणिक संदर्भ संपादक गट*

---